क्रमांक कोन/एल.आर.३४/क-१/९३

पुणे दिनांक :- २५.८.९३.

परिपत्रक :-

मुंबईचा जमीनीचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध आणि जमिन एकत्रिकरण कायदा १९४७ अनुसार जमिन एकत्रिकरण योजना महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आली होती. त्यानुसार सदरच्या योजनेचे काम मात्र दिनांक ४.१.९३ च्या शासन निर्णयानुसार ते स्थगित करण्यात आले आहे. आता पर्यन्त झालेल्या एकत्रिकरण योजनेच्या कामामध्ये, योजना तयार करताना योजना कार्यान्वित करतेवेळी, योजने प्रमाणे ७/१२ चे गांवी प्रख्यापन करतेवेळी, आणि एकत्रिकरण योजनेच्या मसूदावर हूकूम गावचा नकाशा तयार करतेवेळी अनेक प्रकारच्या चूका कर्मचारी / अधिकारी यांचेकडून जाणते/ अजाणते पणी,, तसेच कर्मचारी/ अधिकारी यांच्या निष्काळजीपणा मूळे, बेपर्वाईने, हेतूपुरस्पर ही घडून गेल्या आहेत. असे दिसते. त्यामूळे अशा प्रकारे झालेल्या चूकांमूळे महाराष्टांतील अनेक शेतकऱ्यांना विनाकारण, त्यांचा काहीही दोष नसताना, त्यांच्या तक्रारीची दखल घेणे भाग पडत आहे, भाग पडले आहे. आणि एकत्रिकरण योजनेची ही परिणती योग्य वाटत नाही. त्याची परिणती म्हणजे एकत्रिकरण योजनेच्या कामास शासनाने दिलेली स्थगिती. थोडक्यांत, ज्या एकत्रिकरण योजनेमूळे महाराष्ट्र राज्यांतील जमिन कसणाऱ्या शेतकऱ्यांचे छोटे छोटे तूकडे एकच करुन, त्याचे क्षेत्र एकाच ठिकाणी संघटीत करुन देऊन त्यायोगे त्याची जमिन उत्पादन क्षमता वाढविण्याचा जो हेतू होता, ती अपेक्षेप्रमाणे साध्य झाला नाही आणि त्यास एकत्रिकरण योजनेत झालेल्या / केलेल्या चूकाच सर्वस्वी जबाबदार आहेत, हे कटू सत्य नाकारता येणार नाही.

वरील बाबींचा विचार करुन, आता ज्या काही चूका झाल्या आहेत, त्या सत्वरात सत्वर दुरुस्त करुन, शेतकऱ्यांच्या तक्रारी दूर करण्याच्या दृष्टीने काय चूका झाल्या आहेत व त्या कशा दूर कराव्यात यासाठी यापूर्वीच दिनांक २६.१२.८८ च्या इकडील परिपत्रकान्वये सस्पष्ट सूचना दिल्या गेल्या आहेतच. त्यानुसार म्हणावी तेवढी कार्यवाही अजून होत नसल्याने आता पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. या सूचना वर हूकूम तक्रारी अर्जालगत कार्यवाही करणेची आहे.

१] खातेदारांच्या नांव आडनांवातील चूका :-

एकत्रिकरण योजनेचे शेतपुस्तक ९/३ व ९/४ बाजू लिहीताना, अमलात असलेला ७/१२ पुढे ठेऊन त्या नुसार खातेदारांची नांवे नोट न लिहील्याने वा लक्षपूर्वक न लिहील्याने किंवा वगळल्याने अशा चूका बऱ्याच दृष्टीत्पत्तीस आल्या आहेत. अशा प्रकारचे तक्रारी अर्ज हाताळताना प्रथम पूर्वी, ७/१२, ६ ड चे उतारे तपासून

द्यावेत. बहुतेक शेतकऱ्यांकडे ग्रामपंचायतीकडील परभाडे पावत्या असतात. त्या पडताळून त्यांच्या नांवाचे शुध्दीपत्रक, तयार करून सादर करावे. - सदरचे कार्यवाही करतेवेळी खातेदार पंच यांचे जाबजबाब नोंदवणे आवश्यक वाटत नाही. तरीही ते घेणेचे आहेत. मात्र जे कागदपत्र तपासले त्यांच्या सत्यप्रती, मूळ ७/१२ व ६ ड मात्र प्रकरणी सामील करणे आवश्यक आहे. शुध्दीपत्रकात काय अम्मल घेण्यात येते ओहत्याची लेखी समज अर्जदारास देणे आवश्यक राहील. ही समज त्यांत शुध्दीपत्रक सादर करतेवेळी देण्यात यावी.

२] योजनेपूर्वीच्या अधिकार अभिलेखा प्रमाणे आणेवारीचा अम्मल इतर हक्क विहीरीचे पाणी, घेण्याचे हक्क, कुळाचे हक्क, इतर बोजे, पायवाट, गाडीरस्ता, इत्यादी बाबतचा अम्मल योजनेत न घेणे बाबतच्या तक्रारी.

एकत्रिकरण योजना राबविताना मूळ अधिकार अभिलेखांत दाखल असलेले संबंधित शेतकऱ्यांचे मालकी हक्क जसेच्या तसे योजनेत दाखल केले गेलेले नाहीत. तसेच आणेवारी कूळाचे हक्क इतर हक्क या बाबतची चूका निदर्शनास आल्या आहेत. ह

हे तक्रारी अर्ज हाताळताना, जूने ७/१२, ६ ड चे उतारे योजनेत घेतलेला अम्मल त्यांत झालेली चूक याचा अभ्यास करून प्रकरणी शुध्दीपत्रक सादर करतेवेळी, जूने ७/१२ , ६ ड सह अर्जदार यांचा कारणापुरता जवाब नोंदवावा. ज्याचे नांवे अर्जदारा ऐवजी अम्मल झाला असेल तो खातेदार जबाब देण्यांत टाळाटाळ करण्याची शक्यता असते. अशा वेळी पंचनामा व नोंदवावा. गैर अर्जदारास तसे नियमानुसार डाकनोंदपत्राने कळवावे. त्याची पावती प्रकरणी सामील करावी. विवाद्ग्रस्त प्रकरणात सर्व संबंधितांना नोटीस देऊन हजर ~~हजर~~ राहणे ~~बद्दल~~ कळविणे जेवढे आवश्यक आहे तेवढेच महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे खंड ३ मधील प्रकरण ३, परिच्छेद ७ अनुसार मुक्रर करण्यात आलेला नमूना १२ [ रोजनामा ] वापरणेही आवश्यक राहील. त्यावर अर्जदार गैरअर्जदार यांना दिलेला आदेश / सूचना/ कार्यवाही नोंदवून तो रोजनामा प्रक रणात सामील राहील याची दक्षता घ्यावी.

कोणत्याही परिस्थितीत जून्या अधिकार अभिलेखाप्रमाणे असलेले आणेवारी, मालकी हक्क, इतर हक्क, कुळाचे हक्क इत्यादी बाबत अम्मल कमी करण्याचा किंवा वाढविण्याचा अधिकार योजना राबविताना किंवा तक्रारी अर्जावर कार्यवाही करताना सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांना प्रदान केलेला नाही. ही बाब लक्षात ठेवावी.

३] पोटहिस्सा मोजणी :-
===========================

एकत्रिकरण योजना राबविताना गावचे सर्व्हे नंबर शेत पाहाणी वेळी पडलेले पोटहिस्से आढळून आल्यावर त्यानुसार फरक यादी तयार करून वा वहिवाटीत

२११

बदल आढळून आल्याने पोटहिश्यांची मोजणी करून त्यानुसार खातेदारांना रितसर पूर्व सूचना न देता, किंवा समज न देता मोजणी करण्यात आलेली असून, त्यांना त्यांचे क्षेत्र कमी जास्त झाल्या बद्दल कोणत्याही सूचना न देता, फेरफार होऊन, त्याचे क्षेत्रात बदल केले गेले आहेत, अशा तक्रारी जास्त प्रमाणात आहेत.

एकत्रिकरण योजनेत करण्यात आलेल्या पोटहिस्सा मोजणी बाबत तक्रार आल्यास महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २[१२] अन्वये " जमिन धारकण करणे किंवा भूमि धारक असणे , किंवा जमिनीचा धारक असणे म्हणजेच वैधरित्या जमिनीचा कब्जा असणे, मग तो प्रत्यक्षात असो किंवा नसो " ही तरतूद विचारात घेऊन नियमानुसार कार्यवाही करणेची आहे. त्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.

तसेच आपसातील वाटपानुसार किंवा वंशपरंपरेने वाटणीस आलेल्या जमिनी बाबत ७/१२ सदरी वाटप पूर्ण झालेले असते. कधी कधी ७/१२ सदरी आणेवारी नमूद केलेली असते. तर कधी कधी स्वतंत्र ७/१२ उघडून वाटप कागदोपत्री पूर्ण करण्यात आलेली असते. जागेवर मात्र वहिवाटी स्वतंत्रपणे आढळत नाहीत. अशा प्रकरणी वाटपाप्रमाणे ७/१२ सदरी , जुनी आणेवारी नमूद करावी. मात्र नकाशामध्ये स्वतंत्र वहिवाटी ज्या जागेवर अस्तित्वात नसतील त्या न दाखवता संपूर्ण सर्व्हे नंबरचा टिपण प्रमाणे जसा असेल तसाच देऊन, नवीन अम्मल घेताना, संबंधितांना महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५[ २] नुसार जिल्हाधिकारी यांचेकडे दाद मागुन वाटपत्र कायम करुन घेण्याच्या सूचना / समज देऊन शुध्दीपत्रक सादर करावे.

पोटहिस्सा मोजणीमध्ये जमिनीचे हस्तांतरण ट्रान्सफर ऑफ प्रॉपर्टी ॲक्ट मधील जरुर त्या तरतूदीनुसार होत आहे, हे कटाक्षाने पहावे. कोणत्याही परिस्थितीत प्रत्यक्ष वहिवाटीचे क्षेत्र विचारात न घेता योजनेपूर्वीच्या अधिकार अभिलेखावर जे क्षेत्र नमूद केले असेल त्याचाच अम्मल घेणेचा आहे. हे कटाक्षाने लक्षात ठेवावे.

अशा तक्रारी अर्जा प्रकरणी अर्जदार, गैरअर्जदार लगत कब्जेदार यांना रितसर नोटीसा काढाव्यात. मोजणीचे वेळी ज्यांच्या क्षेत्रांची मोजणी केली आहे त्याचे गावांचे गुणाकार बुक भरून त्यांच्या स्वाक्षऱ्या घ्यावेत. क्षेत्राची समज रितसर देण्यांत यावी. जाबजबाब , पंचनत, रोजनामा आवश्यक आहे.

अशा तक्रारी अर्जाच्या मोजणीवेळी एकत्रिकरण भूमापकाने, सदर मोजणीचा नकाशा सत्वर त्यांवर जरुर त्या खुलासा टीपा, स्केल दिशा इत्यादी बाबींची पूर्तता करुंन क्षेत्राचे वसलेवार तयार करून प्रकरणी सामील करणेचा आहे. अशा मोजणी कामाची तपासणी झाल्यावर तपासणी अम्मलदाराने तसा शेरा तपासणी करता क्षणीच नकाशावर ठेवावयाचा आहे. असे शेरे बऱ्याच प्रकरणात न ठेवल्याने बरीच प्रकरणे नाहक त्या

पूर्ततेसाठी

२३४

पूर्ततेसाठी प्रलंबित आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी / कर्मचाऱ्यांनी अशी कार्यवाही पूर्ण केलेली आहे, त्यांनी ती आता तात्काळ पूर्ण करुन घ्यावी. न पेक्षा अशा अपूर्तता निदर्शनास येताच त्यांचे विरुध्द जरुर ती कार्यवाही सुरु केली जाईल, याची नोंद घ्यावी.

४] गटबांधणीबाबत तक्रारी :-

एकत्रिकरण योजना राबवितानां खातेदार , शेतकरी, यांच्यात आपसात कबूलीजबाब होऊन सर्वसम्मतीचे गटबांधणी करणे आवश्यक ठरविले होते. तथापी अशा प्रकारणे गटबांधणी न करता, गट बांधणीतील काही खातेदारांना अंधारात ठेऊन त्यांना विश्वासात न घेता, गटबांधणी करण्यात आलेली आहे. कधी कधी गटबांधणी करताना शेतकऱ्यांचे मोठे क्षेत्राचे तुकडे करुन, बागायती जमिनी ऐवजी जिरायती, कमी दर्जाच्या जमिनी देऊन, राहते घर, मोठे , विहीरीचे क्षेत्र तोडून देऊन गटबांधणी करण्यात आली आहे. काही ठिकाणी गावठाणा जवळील जमिनी गटबांधणीत बदलून गावापासून दूर वरील जमिनी देण्यात आल्या आहेत. तर एकाच प्रतिच्या जमिनीत अदला बदल न करता बागायत / जिरायत, खडकाळ, मुरबाड जमिनीत अदला बदल करुन तक्रारींना वाव देण्यात आला आहे. काही ठिकाणी गट बांधणी करताना जून्या क्षेत्राएवढा किंवा त्यास साजेसा क्षेत्राचा मोबदला दिलेला नाही. तर काही प्रकरणात गटबांधणीत मोबदलेच दिले गेले नाहीत. तर कधी कधी गटबांधणी करताना कुळांचे हक्क विचारात न घेताच गट बांधणी करुन कुळाचे हक्क उडविले गेले आहेत. गटबांधणी करताना विचारात न घेताच गटबांधणी करुन कुळांचे हक्क उडविले गेले आहेत. गट बांधणी करताना इनाम जमिनी अल्प भूधारकांच्या जमिनी, स्त्रियांचे नावावरील जमिनी, कुळांच्या जिमीनी यातही अदला बदली करताना त्यांचेवर अन्यायकारक अदला बदल कधि कधि लादली गेली आहे. थोडक्यात इकडून वेळोवेळी दिलेल्या सूचना परिपत्रके यामध्ये घालून दिलेली कार्यपध्दती अमलात आणली गेलेली नाही. तसेच एकत्रिकरण योजनेचा मूख्य हेतूच दुर्लक्षित केला गेला आहे.

आता अशा चूका दुरुस्त करण्या बाबत केलेल्या अर्जांच्या अनुषंगाने कार्यवाही करताना, गटबांधणीत वर नमूद केलेले दोष विचारात घेऊन ते दोष दूर करण्या बाबत जरुर ती कार्यवाही करावी. त्यासाठी फेर गटबांधणीचा प्रयत्न करावा.

फेर गटबांधणीच करताना मोठे तुकडे तोडू नयेत. एकाच प्रतिच्या जमिनीत गटबांधणी करावी. बागायती क्षेत्र बदलून जाताना बागायती क्षेत्रच बदलून हे मिळेल हे पहावे. अदला बदल करताना क्षेत्र, मगदूर, आकार पाणी पुरवठयाची सुविधा इत्यादी बाबी विचारात घेऊन सर्वसम्मत दुरुस्ती योजना सादर करण्याची दक्षता घ्यावी. ज्या तक्रारी प्रकरणात अशी सर्वसम्मत तडजोड शक्य होत नसेल तर किंमतीवर गटबांधणी करावी. त्यातूनही तक्रार दूर होत नसेल

२५४

त्यातूनही तक्रार दूर होत नसेल तर ते प्रस्ताव इकडे सादर करावे. कोणत्याही परिस्थितीत अर्जदारांच्या तक्रारीची गंभीरपणे दखल घेऊन वेळोवेळी काढलेली परिपत्रके /त्यातील सूचना विचारात घेऊनच कार्यवाही करावी.

५] कायम खात्याचे अम्मल :-
==================================

एकत्रिकरण योजनेत एक मालकी खाती, गटबांधणीत न आलेली खाती, यांचा अंमल घेता ना ब-याच चुका झालेल्या आहेत. कायम जमिनीच्या नोंदी नीटपणे न घेता योजनेचा मसूदा तयार केला गेला आहे. त्यावर झालेले तक्रारी अर्जही बरेच आहेत.

अशा प्रकारचे अर्जांवर कार्यवाही करताना जूना अधिकार अभिलेख ६ ड, योजनेची ९/३, ९/४ बाजू तपासून अर्जदाराची तक्रार काय आहे, गैरअर्जदार यांचा संबंध आहे काय ? याची खात्री करून कारणापुरता अर्जदार गैरअर्जदार / पंचमत नोंदवून रोजनामा ठेऊन, आवश्यक त्या अधिकार अभिलेखांच्या प्रतिसह शुध्दीपत्रक सादर करावे. संबंधितांना रितसर समज देऊन त्या बाबतचे कागदपत्र सामील करावेत.

६] ताबे देणे / घेणेची कार्यवाही :-
================================

एकत्रिकरण योजनेत झालेल्या सर्वसम्मत गटबांधणीनुसार योजना मंजूर हो= होताच, संबंधितांना प्रत्यक्ष जागेवर जाऊन, झालेल्या गटबांधणीप्रमाणे मोजणी नकाशा आधारे प्रत्यक्ष बदलून आलेल्या / गेलेल्या जमिनीच्या हद्दी खुणा कायम करून ताबे देणे घेणे कामी कार्य वाही करणे कायद्याने बंधनकारक आहे. मात्र तशी कार्यवाही वेळीच न झाल्याने ताब्या बाबत अनेक तक्रारी अर्ज प्राप्त झालेले आहेत.

अशा पकारचे तक्रारी अर्जांवर, कार्यवाही करताना गटबांधणी या जबाब, त्याचवेळी तयार केलेला जबाबाचा नकाशा, या वरून जागेवर जाऊन प्रत्यक्ष मोजणी करून जमिनीच्या हद्दी खुणा कायम करून ताबे दिले गेले आहेत काय ? याची खात्री करावी. नसल्यास त्यानुसार मोजणी करून ताबे देणे घेणेची कार्यवाही करून ताबे पावत्यावर रितसर सह्या घेऊन पंचनामे जबाब नोंदवून तसे अहवाल प्रकरणा सह सादर करावेत. जे तक्रारी अर्ज ३ वर्षांचे पूर्वीच्या एकत्रिकरण योजनेच्या ताब्या बाबत असतील त्यावर कार्यवाहीसाठी अर्जदाराने जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख कडून रितसर मोजणी करून हद्द कायम करून घेणे बाबत उपसंचालक भूमि. अभिलेख यांनी अर्जदारास तसे कळवून निकाली काढावेत.

२३९

२९८

७ कागदोपत्रीच ही कार्यवाही केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधीत एकत्रिकरण, भूमापकास / निमतानदार व सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनाच पूर्णत: दोषी धरून कार्यवाही केली जाईल हे लक्षांत ठेवावे.

७] नकाशे :-
==============

एकत्रिकरण योजनेच्या मसूदयाप्रमाणे झालेली गटबांधणी विचारात घेऊन दिलेल्या गट नंबराप्रमाणे गटाचे नकाशे तयार करताना, नदी, नाले, ओढे, ओहोळ, पाऊलवाटा, रस्ते, राजरस्ते, हमरस्ते, डोंगरे इत्यादी भौगोलिक बाबी नकाशात व्यवस्थित बिनचूकपणे बसविणे आवश्यक आहे. त्याकडे ही बरेच दुर्लक्ष झालेने नकाशा चूकल्या बद्दल अनेक तक्रारी अर्ज आले आहेत, ते टाळण्यासाठी जरुर ती दक्षता घ्यावी. यापुढे अशा चूकाबद्दल संबंधीत सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांना जबाबदार धरले जाईल, याची नोंद घ्यावी.

८] प्रख्यापन :-
==================

एकत्रिकरण योजनेप्रमाणे ७/१२ लिहून पूर्ण झाल्यानंतर खातेदारांची आडनावे क्षेत्र , आकार इतर हक्क इत्यादींची खात्री न करताच प्रख्यापन झाल्याने ७/१२ सदरी झालेल्या चुकाबद्दल अनेक तक्रारी अर्ज प्राप्त झाले आहेत.

या पुढे अशा तक्रारी उदभवू नयेत यासाठी योजनेच्या मसूदयाप्रमाणे लिहीलेला ७/१२ व त्यावरील इतर हक्क, इतर बाबी व्यवस्थित , बिनचूकपणे लिहील्या आहेत. याची खातरजमा संबंधित सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनी स्वत: करणेची आहे. जर अशा चूका उर्वरीत प्रख्यापन होणेवर शिल्लक गावात झाल्यास संबंधीत सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनी सर्वस्वी जबाबदार धरुन शिस्तभंगाची कार्यवाही सुरु केली जाईल याची समज संबंधतानी घ्यावी.

९] अधिकार पत्रे :-
======================

एकत्रिकरण योजना राबविताना ब-याच वेळी ज्या खातेदारांच्या नांवे अधिकार अभिलेख असतात, ते खातेदार/ शेतकरी यांचा योजनेचे वेळी जाबजबाब नोंदविताना प्रत्यक्ष सहभाग आवश्यक असतो. त्यांच्या स्वाक्षरीप्रमाणे निशाणी अंगठ्याची आवश्यकता असते. परंतू काही वेळा असे खातेदार एकतर गैरहजर राहतात किंवा स्वत:चा मुलगा/ जवळचा नातेवाईक किंवा इतर जणांस यांची आपल्या वतीने अधिकार पत्रे देऊन कार्यवाहीसाठी सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी / एकत्रिकरण अधिकारी यांचेकडे पाठवितात.

मात्र त्यांचेकडे देण्यात आलेली अधिकार पत्रे ही प्रचलित कायदयानुसार रितसर केलेली/ नोंदविलेली नसतात. हया बाबी लक्षात घेऊनही त्याकडे दुर्लक्ष करुन, प्रकरणे तशीच सादर केली जातात. सबब यापुढे खातेदाराऐवजी इतर इसम अशा प्रसंगी जाबजबाब नोंदविणे कामी हजर राहणार असतील तर रितसर तयार केलेले नोंदलेले अधिकारपत्राचा आग्रह धरावा. अधिकृत प्राधिकार पत्राशिवाय कोणतीही कार्यवाही ग्राहय ठरत नाही ही बाब कटाक्षाने लक्षात ठेवावी.

यापुढे जाबजबाब, कब्जेपावत्या, नावे देणे इत्यादी वेळी ही बाब सर्व प्राधान्याने लक्षांत ठेवून कार्यवाही करणेची आहे.

संपूर्ण कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर वरिष्ट कार्यालयाकडे सादर करण्याची प्रकरणे नीट तपासून सादर केली जात नाहीत. त्यांत अनेक उणीवा त्रूटी तशाच राहतात. ही बाब ही अर्जदारास न्यायापासून दूर ठेवते ही बाब स्पष्ट आहे. यापुढे प्रकरणे सादर करताना त्यात त्रूटी/ उणिवा राहणार नाहीत याची प्रत्येक सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी यांनी खात्री करण्याची व्यक्तिशः दक्षता घ्यावी.

वरिष्ट कार्यालयाकडून त्यांचेवर सादर केलेल्या प्रकरणामध्ये काय त्रूटी आहेत हे एकाच वेळी कनिष्ट कार्यालयात ज्ञात केले जात नाही. ही बाबही असमाधान कारक आहे. तसेच नको ते शक उणीवा काढून प्रकरणे विनाकारण परत केली जातात. लहान लहान चूका ज्या तपासणीमध्ये दुरुस्त करणे आवश्यक आहे त्यासाठी शासनाच्या खर्चाचा विचार न करता टपाल हशीलावर बराचसा खर्च केला जातो. तसेच अर्जदारास त्यांचे प्रकरणी न्याय मिळण्यास विलंब होतो. ती वेगळाच. हया गोष्टी टाळण्याचा यापुढे कटाक्षाने प्रयत्न करावा. अशा बाबी पुन्हा दृष्टोत्पत्तीस येऊ नयेत. आल्यास त्याची अत्यंत गंभीरपणे दखल घेतली जाईल याची नोंद घ्यावी.

एकत्रिकरण योजनेवर आतापर्यन्त आलेले तक्रारी अर्ज परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या कारणास्तव आले आहेत. याचा विचार करता प्रत्येक प्रकरणात झालेली चूक कर्मचारी/ अधिकारी यांच्या निष्काळजीपणामूळे / बेपर्वावृत्तीमूळे झाली काय ? याची खात्री करुन, अशा कर्मचारी/ अधिकारी यांची नांवे ते सध्या सेवेत असल्यास कोठे? निवृत्त झाले असल्यास कधी ? निवृत्त झाले आहेत या बाबतची माहिती अहवालासह स्पष्ट पणे नमूद करावी.

त्याचप्रमाणे आता ज्या तक्रारी अर्जांवर कार्यवाही करण्यात येत आहे, त्यामध्ये ही कर्मचारी/ अधिकारी हेतुत: विलंब करीत आहेत, असेही निदर्शनास आले आहे. या बाबतही यापुढे अशा विलंबास जे जबाबदार असतील त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीसंदर्भात प्रस्तावही स्वतंत्रपणे सादर करण्याची दक्षता घ्यावी.

(229)

एकत्रिकरण योजनेवरील तक्रारी अर्जाचा निपटारा सत्वर होणे करिता या सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.. ही बाब लक्षात ठेऊन शिघ्रगतीने प्रकरणे निकाली निघतील अशा पध्दतीने कार्यवाही करण्यात यावी. तक्रारीचे निवारण ७/१२ मिळाल्यानंतर झाल्याने खातेदाराची तक्रार मिटलेली असते. परंतू त्याप्रमाणे भूमि अभिलेखाचे अनुसरण काम झालेले नसल्याने मूळ अभिलेख अद्यावत होत नाहीत. त्याकामी शुध्दीपत्रक / दुरुस्ती योजना प्रमाणेच अनुसरण काम कमी जास्त पत्रक / नकाशा दुरुस्ती होऊन अभिलेख अद्यावत आणणेचे दृष्टीने कार्यवाही सत्वर होणे आवश्यक आहे. तसेच दुरुस्ती योजना/ शुध्दीपत्रक मंजूर झाल्यानंतर व शुध्दीपत्रके प्रसिध्दीच्या मुदतीत तक्रार न आल्याची खात्री झाल्यानंतर त्या बाबत महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ कलम १५० खालील नियमावरील नियम ३६ नुसार अधिकार अभिलेखास त्वरीत अम्मल घेतल्यास त्यामूळे दुरुस्तीचे ७/१२ संबंधीत खातेदारांना सत्वर उपलब्ध होतील. उपर्लिखीत सूचना तंतोतंत पाळण्याची काळजी घ्यावी.

सहि /-xxx

स्थळ प्रतिवर मा.ज.आ.पुणे यांची स्वाक्षरी असे.

जमाबंदी आयुक्त आणि संचालक
भूमि अभिलेख [म. रा. ] पुणे
यांचे करिता.

प्रत :- उपसंचालक भूमि अभिलेख [सर्व ]

प्रत :-अधिक्षक भूमि अभिलेख, विशेष अधिक्षक भूमि अभिलेख , [नगर भूमापन] आणि एकत्रिकरण अधिकारी [ सर्व ]

प्रत :- सहाय्यक एकत्रिकरण अधिकारी [ सर्व ]

==============================

क्रमांक एकत्रि /तक्रारी अर्ज कार्यपध्दती/९५
पुणे , दिनांक /:- ४.९.१९९५.

सर्व तालुका निरीक्षक भूमि अभिलेख / अधिक्षक भूमि अभिलेख, पुणे विभाग यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

अधिक्षक भूमि अभिलेख संलग्न,
उपसंचालक भूमि अभिलेख ,
पुणे प्रदेश, पुणे.

284